# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- द्द्धःद्.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३३-२३** **दिनांक ३०/०१/२०२३**

## वेश्याव्यवसाय करणा-या आरोपीतांस अटक करुन ०१ पिडित महिलेची सुटका अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांची कामगिरी.

दि. २८.०१.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, जिनत खान रा. मालाड, मालवणी, मुंबई हि वेश्याव्यवसाय करीत असून तिच्या मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, ती पुरुष गिऱ्हाईकाशी बोलणी करुन तिचा व्हॉटसअ‍ॅप मोबाईल क्रमांकावरुन व्हॉटसअ‍ॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना मुलींचे फोटो पाठवुन मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये गिऱ्हाईकास रुम बुक करावयास सांगुन वेश्यागमनाचा मोबदला घेवुन पुरुष गिऱ्हाईकास वेश्यागमनासाठी मुली पुरविते.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने श्री. समीर अहिरराव, पोलीस निरिक्षक, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन वेश्यादलाल महिला आरोपी १) जिनत खान रा. मालाड- मालवणी, मुंबई हिने बोगस गिऱ्हाईकास ऊडलॅन्ड हॉटेल आणि लॉजिंग बोर्डीग, रामदेव पार्क, चे मेनगेट समोर, मिरारोड पूर्व या ठिकाणी बोलावून तीचा साथीदार ॲटो रिक्षा चालक २) सद्दाम नसिम हुसेन, वय-२५ वर्ष, सध्या रा. साकिनाका, अंधेरी (प.), मुंबई यांनी वेश्यागमनाकरीता ०१ महिलेस ऊडलॅन्ड हॉटेल आणि लॉजिंग बोर्डीगचे मेनगेट समोर, मिरारोड पूर्व या ठिकाणी घेवून आले असता पंचाच्या समक्ष बोगस गिऱ्हाईकास महिलेस दाखवुन त्या बदल्यात एका मुलीचा वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन ठरलेली रक्कम महिला वेश्यादलाल जिनत खान हिचे मार्फतीने वेश्यादलाल ॲटो रिक्षा चालक सद्दाम हुसेन यांनी स्वीकारल्याने त्यांना १६.५० वा. ताब्यात घेवुन केलेल्या चौकशीत पिडीत महिलेला वेश्यादलाल जिनत खान व तिचा साथीदार सुद्दाम नसिम हुसेन व पाहिजे आरोपी सोनु व पिन्टु पूर्ण नाव माहित नाही यांनी पिडीत महिलेस पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन पाठविले असल्याचे निष्पन्न झाल्याने महिला वेश्यादलाल जिनत खान व पुरुष वेश्यादलाल सद्दाम हुसेन यांना सापळा कारवाई करुन रोख रक्कम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले आहे. ०१ पिडित महिलेची सुटका करण्यात आली असुन सदरबाबत स.फौ. उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन वर नमुद आरोपीतांविरुध्द मिरारोड पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नं. I ३६/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३७०,३४ सह अ. व्या. प्रति. अधि. १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप. आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, पो.अंम. केशव शिंदे, चा.पो.हवा. गावडे, सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर व महिला म.पो. अंम. आफ्रिन जुन्नेदी नेम. भरोसा सेल यांनी केली आहे.

---------ooo----------